नि.फौ.ख.क्र.१६३/२०२२
सरकार वि.राजेश
नि.क्र.१४

साक्षीदार क्र **०३** ची सरतपासणी
देवाची शपथ खरे सांगतो
नाव :–तुळशीराम नुसाजी पाटील
वय:–५९ वर्ष, व्यवसाय–शेती.
राह.परसोडी, ता.उमरेड, जि.नागपूर.

**सरतपासणी सरकारी वकील श्री.जे.एम.बोरकर यांच्या मार्फत**

१. पोलिसांनी मला पंचनामा करण्याकामी समन्सपत्र दिले नव्हते. आता मला समन्सपत्र दाखविण्यात आले त्यावर माझी सही आहे त्यातील मजकुर मला माहिती नाही सहीपुरता **निशानी क्र. १५** देण्यात आला. आता घटनास्थळ पंचनामा दाखविण्यात आला त्यावर माझी सही आहे त्यातील मजकुर मला माहिती नाही सहीपुरता **निशानी क्र. १६** देण्यात आला. आता जप्ती पंचनामा दाखविण्यात आला त्यावर माझी सही आहे त्यातील मजकुर मला माहिती नाही सहीपुरता **निशानी क्र. १७** देण्यात आला.

**सदर साक्षीदार अभियोग पक्षास कोणत्याही मुद्दयावर सहकार्य करीत नसल्याने त्यास उत्तरसुचक प्रश्न विचारण्याची परवानगी मागितली असता, परवानगी देण्यात येते.**

२. हे म्हणणे खरे नाही की, दि.२८/०८/२०२२ रोजी मला पोलिसांनी घटनास्थळ व जप्ती पंचनामा करण्यासाठी बोलविले होते व माझ्यासमक्ष पोलिसांनी घटनास्थळ पंचनामा माझ्यासमक्ष तयार केला मला वाचुन दाखविला व त्यानंतर मी त्यावर सही केली. हे म्हणणे खरे नाही की, माझ्यासमक्ष आरोपीचा शर्ट पोलिसांनी जप्त केला होता. हे म्हणणे खरे नाही की, आरोपी ओळखीचा असल्यामुळे त्याला वाचविण्यासाठी मी खोटी साक्ष देत आहे.

**सरतपास संपला.**

**आरोपीतर्फे उलटतपास श्री.एम.आर.धांडे यांनी नाकारला.**

**फेरतपास नाही.**

वा.दा.ब.अ.सा. समक्ष

(आर.एस.मानकर)
न्यायदंडाधिकारी प्रथम श्रेणी, उमरेड
दि.१०.०६.२०२५

(आर.एस.मानकर)
न्यायदंडाधिकारी प्रथम श्रेणी, उमरेड